महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

जा.क्र. : औसंवि/अ/८९७८ दिनांक : १५/०३/२०१४

# परिपत्रक

**विषय :** महावितरणच्या विविध कार्यालयामध्ये सुरक्षा रक्षकांची बाह्यस्त्रोताद्वारे नेमणूक करण्याबाबत व त्यांना द्यावयाच्या किमान वेतन व भत्त्याबाबत.

**संदर्भ :** १) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. मासैम-१०९९/२३९०/प्र.क्र.२४४/९९/२८ दि. १८/०१/२००२.
२) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एसजीऐ-१५०६/प्र.क्र.९२/काम-५, दि. ०८/११/२००६.
३) प्रशासकीय परिपत्रक क्र. ३०३ दि. २६/०७/२०१०.
४) सांघिक कार्यालयाचे पत्र क्र. काऔसंवि/अ/१५७७७, दि. २०/०५/२०११.
५) सांघिक कार्यालयाचे पत्र क्र. काऔसंवि/अ/२३८८०, दि. २३/०८/२०१२.

************

महावितरण कंपनीच्या विविध कार्यालयामध्ये बाह्यस्त्रोताद्वारे सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करताण्यात येते. महाराष्ट्र शासनाच्या वरील संदर्भ क्र. १ व २ च्या शासन निर्णया नुसार सरकारी / निमसरकारी क्षेत्रे / उपक्रम / शासकीय मंडळे / महामंडळे / महानगरपालिका / स्थानिक स्वराज्य संस्था / सहकारी संस्था / शासकीय कार्यालये इत्यादीना ज्या - ज्या वेळी सुरक्षा रक्षक लागतील तेव्हा त्यांनी खाजगी अभिकरणामधून सुरक्षा रक्षक न मागविता शासनाने मान्यता दिलेल्या माजी सैनिक महामंडळाकडून (बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा वगळून) अथवा जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षक नियुक्त करावे असे निर्देश दिले आहेत.

सदर शासन निर्णया नुसार वरील संदर्भ क्र. ३ नुसार क्षेत्रीय कार्यालयांना त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आलेले होते. तसेच वरील संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. काऔसवि/अ/३३१७ दि. ०१/०२/२०१० अन्वये "कंत्राटी कामगारांना देय असणारे वेतन महाराष्ट्र राज्य माजी सैनीक महामंडळाकडून (बृहन्मुंबई व ठाणे वगळून) घेण्यात येणाऱ्या सुरक्षा रक्षकांच्या बाबतीत लागू नसून त्यांना वरील संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून महाराष्ट्र राज्य माजी सैनीक महामंडळाकडून सुरक्षा रक्षकांसाठी वेळोवेळी जाहीर केलेल्या दराप्रमाणे किमान वेतन व इतर भत्ते अदा करावे" असे निर्देश यापुर्वीच देण्यात आलेले होते.

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. एसजीऐ-१५०६/प्र.क्र.९२/काम-५ दि. ०८ नोव्हेंबर २००६ व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम -१९८१ लागू करुन सदर अधिनियमाच्या कलम १५ (१) नुसार स्थापन केलेल्या समितीने शिफारस केल्यानुसार दि. १४/०६/२००६ रोजीच्या बैठकीत निर्णय घेण्यात येवून सदर अधिनियमाच्या कलम २३ नुसार बृहन्मुंबई, ठाणे या जिल्ह्या व्यतिरिक्त पुणे, नाशिक, रायगड, औरंगाबाद व नागपूर या जिल्ह्यांसाठी सुरक्षा रक्षक मंडळे निर्माण केलेली आहेत. त्यानुसार जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडून बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्त करण्यात येणाऱ्या सुरक्षा रक्षकांना देखील जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाने वेळोवेळी जाहिर केलेले किमान वेतनाचे दर व कामगार उपायुक्त (ग्रा. वि.) व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम - १९४८, मुंबई यांनी वेळोवेळी जाहिर केलेले विशेष भत्याचे दर अदा करण्यात यावे अशी मागणी जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडून करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी महावितरण कंपनीमध्ये करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापनाच्या विचाराधीन होता. आता संचालक (वित्त) यांनी कार्यकारी संचालक (मा.सं.) यांच्याशी विचार विनिमय करुन

महावितरणच्या विविध कार्यालयामध्ये सुरक्षा रक्षकांची बाह्यस्त्रोताद्वारे नेमणूक करण्याबाबत व त्यांना द्यावयाच्या किमान वेतन व भत्त्याबाबत खालील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

(अ) महावितरण कंपनीच्या विविध कार्यालयांमध्ये सुरक्षा रक्षकांची बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्ती करतांना खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम राहील.

१) महावितरण कंपनीच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांकरिता बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्यांतील कार्यालये वगळून : **महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळामार्फत सुरक्षा रक्षक निविदा पध्दतीचा अवलंब न करता बाह्यस्त्रोताद्वारे घेण्यात यावे.**

२) बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्यांतील महावितरण कंपनीच्या कार्यालयांकरिता : **जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामार्फत सुरक्षा रक्षक निविदा पध्दतीचा अवलंब न करता बाह्यस्त्रोताद्वारे घेण्यात यावे.**

३) पुणे, नाशिक, रायगड, औरंगाबाद व नागपूर या जिल्ह्यांतील महावितरण कंपनीच्या कार्यालयांकरिता : **महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ आणि जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांच्यापैकी ज्यांनी किफायतशीर दरामध्ये सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव सादर केला आहे त्यांच्या मार्फत सुरक्षा रक्षक निविदा पध्दतीचा अवलंब न करता बाह्यस्त्रोताद्वारे घेण्यात यावे.**

४) ज्या वेळेस महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ अथवा जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामार्फत सुरक्षा रक्षक उपलब्ध होणार नाहीत **अशा वेळी खाजगी अभिकरणामधून सुरक्षा रक्षक निविदा पध्दतीचा अवलंब करुन बाह्यस्त्रोताद्वारे घेण्यात यावे.**

**(ब) वर नमुद १ ते ४ नुसार सुरक्षा रक्षकांची बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्ती करताना त्यांना द्यावयाच्या किमान वेतन व इतर भत्त्याबाबत :**

**(अ) मधील १ व ३ करीता :** महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या सुरक्षा रक्षकांना महासंचालक पुनर्वास, संरक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी प्रसारीत केलेले किमान वेतन व कामगार उपायुक्त (ग्रा.वि.) व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम -१९४८ मुंबई यांनी जाहीर केलेले विशेष भत्त्यांचे दर अदा करावे.

**(अ) मधील २ व ३ करीता :** संबंधीत जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या सुरक्षा रक्षकांना संबंधीत जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाने जाहीर केलेले किमान वेतन व कामगार उपायुक्त (ग्रा.वि.) व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम -१९४८ मुंबई यांनी जाहीर केलेले विशेष भत्त्यांचे दर अदा करावे.

**(अ) मधील ४ करीता :** ज्या वेळेस महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ अथवा जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामार्फत सुरक्षा रक्षक उपलब्ध होणार नाहीत अशा वेळी खाजगी अभिकरणामधून बाह्यस्त्रोताद्वारे सुरक्षा रक्षक घेण्यात आल्यास त्यांना सांघिक कार्यालयामार्फत प्रसारीत करण्यात आलेले किमान वेतनाबाबतचे परिपत्रक क्र. २३८८०, दि. २३/०८/२०१२ अन्वये किमान वेतन व इतर भत्ते अदा करण्यात यावे.

यास्तव महावितरण कंपनीच्या विविध कार्यालयांमध्ये सुरक्षा रक्षकांची बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्ती करताना वरील निर्देशांचे कटाक्षाने पालन करावे.

सदर परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

(अभिजीत देशपांडे)
कार्यकारी संचालक (मा.सं.)